ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक १० • मंगळवार दि.२९ सप्टेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

# मुदखेड,मुखेड तालुक्यातील दुष्काळी भागांना मदतीचा मार्ग मोकळा

## यादीतून वगळलेल्या गावांना अन्य निकषांवर मदत-मुख्यमंत्री फडणवीस



मुंबई/प्रतिनिधी-राज्य शासनाने दुष्काळग्रस्त भागाचा आढावा घेण्यासाठी जाहीर करण्यात आलेल्या ट्रिगर १ मधून वगळलेल्या मुखेड, मुदखेड सारख्या तालुक्यांचा समावेश करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करुन या दुष्काळग्रस्त भागांचा अन्य निकषांवर प्रस्ताव सादर करावा असे आदेश राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले आहेत. दुष्काळ-ग्रस्तांसाठी गठीत झालेल्या मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीत मंत्र्यांनी आपले प्रस्ताव दाखल करावेत अशा सुचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत निकषांअभावी वगळलेल्या तालुक्यांतील शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने मदतीचा मार्ग खुला केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या तालुक्यांसाठी अन्य निकषांच्या आधारे मदतीचे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत दुष्काळ निवारण, शेतकरी मदत, पाणी नियोजन तसेच विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कासंदर्भात विविध सूचना देण्यात आल्या. विशेष म्हणजे दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत निकषांअभावी समावेश न झालेल्या तालुक्यांबाबत अन्य निकषांच्या आधारे मदतीचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहेत. त्यामुळे यादीतून वगळलेल्या तालुक्यांतील शेतकऱ्यांना मदतीचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठका नियमित घेऊन मंत्र्यांनी मदतीसंदर्भातील सूचना सादर कराव्यात, असेही फडणवीस यांनी सांगितले. त्यामुळे दुष्काळी यादीतून वगळलेल्या तालुक्यांतील हजारो पान ४ वर

## मंत्रिमंडळ बैठकीत १० महत्त्वपूर्ण निर्णय

# अग्निवीरांना सरकारी नौकरीत आरक्षण,वैरण धोरणाला मंजुरी

मुंबई/प्रतिनिधी-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत माजी अग्निवीरांसह विविध विभागांशी संबंधित १० महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. चार वर्षांची लष्करी सेवा पूर्ण करून बाहेर पडलेल्या माजी अग्निवीरांना राज्य सरकारी सेवेत १० टक्के समांतर आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला. गट-कमधील गणवेशधारी सेवांमध्ये त्यांना नियुक्तीची संधी मिळणार आहे. तर दुष्काळी भागात जनावरांसाठी वैरण विकास धोरणालाही राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यामध्ये अग्निपथ योजनेअंतर्गत चार वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या अग्निवीरांच्या पुनर्वसनासाठी हे धोरण निश्चित करण्यात आले आहे. महाराष्ट्र पोलीस, राज्य राखीव पोलीस दल तसेच तत्सम गणवेशधारी सेवांमध्ये त्यांना संधी मिळणार आहे. बैठकीत राज्यातील काही तालुक्यांचा दुष्काळी तालुक्यांच्या यादीत समावेश न झाल्याच्या विषयावरही चर्चा झाली. पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र वैरण विकास धोरण जाहीर करण्यास मंजुरी देण्यात आली. जिल्हानिहाय चारा उत्पादन, सुधारित चारा पिके, गवतांच्या जाती तसेच पारंपरिक व पान ४ वर

# ज्ञानेशकुमार विरोधात याचिकेला सुप्रिम कोर्टाची सहमती

नवी दिल्ली:भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखालील निवडणूक आयोगाच्या निर्णयप्रक्रियेवर तसेच निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांनी आयोगातील काही निर्णयांबाबत आक्षेप नोंदवल्याच्या पार्श्वभूमीवर, आणि मुख्य निवडणूक आयुक्तांना बहुमत नसताना निवडणूक आयोगाच्या वतीने एकतर्फी निर्णय घेण्याचा अधिकार आहे का, असा सवाल करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. या याचिकेवर पुढील आठवड्यात सुनावणी घेण्यास न्यायालयाने मंगळवारी, २९ सप्टेंबर रोजी सहमती दर्शवली.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील तीन सदस्यीय खंडपीठासमोर याचिकाकर्ते राकेश कुमार सिंग यांच्या वतीने ज्येष्ठ वकील विकास सिंग यांनी हा मुद्दा उपस्थित केला. बहुसदस्यीय निवडणूक आयोगाच्या निर्णयप्रक्रियेबाबत कायद्यातील तरतुदींचा दाखला देत आयोगाचे निर्णय एकमताने किंवा बहुमताने होणे अपेक्षित असल्याचा युक्तिवाद त्यांनी केला. या महत्त्वाच्या घटनात्मक प्रश्नावर लवकर सुनावणी घेण्याची विनंतीही त्यांनी न्यायालयाकडे केली.याचिकाकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, संविधानाच्या अनुच्छेद ३२४ अंतर्गत निवडणुकांवरील देखरेख, निर्देशन आणि नियंत्रणाची जबाबदारी ही केवळ मुख्य निवडणूक आयुक्तांकडे नसून संपूर्ण निवडणूक आयोगाकडे सोपविण्यात आली आहे. त्यामुळे आयोगाचे सामूहिक अधिकार एखाद्या एका पदाधिकाऱ्याने स्वतंत्रपणे वापरता येतात का, हा या याचिकेतील प्रमुख कायदेशीर प्रश्न आहे.याचिकेत मुख्य निवडणूक आयुक्तांच्या अधिकारांबाबत स्पष्टीकरण मागण्यासाठी क्वो वॉरंटो स्वरूपाच्या दिलासाची मागणी करण्यात आली आहे. तसेच आयोगाच्या सामूहिक निर्णयक्षमतेचा वैयक्तिक अधिकार म्हणून वापर कोणत्या घटनात्मक किंवा कायदेशीर तरतुदीनुसार करण्यात आला, याचे स्पष्टीकरण देण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.तसेच यामध्ये मतदार नोंदणी, मतदार यादीचा डेटा, फॉर्म-६ आणि माहिती-तंत्रज्ञान प्रणालीशी संबंधित मुद्द्यांचा समावेश असल्याचे वृत्त आहे. पान ४ वर



पारंपारिक लिंगायत,फुलारी समाज व फुल उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी झोपलेल्या मनपा प्रशासनाला जागे करण्यासाठी आजपासून महापालिकेसमोर आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. यावेळी गणेश उर्फ मनिष मलकार्जुन फुलारी यांच्यासह फुलारी समाज बांधव व फुल उत्पादक शेतकरी उपस्थित होते. (छाया : करणसिंह बैस)

# मातंग समाजाच्या मोर्चाने मुंबई तुंबली

## सीएसएमटी परिसरात ठिय्या; पोलिसांची धावपळ

मुंबई/प्रतिनिधी-अनुसूचित जातींच्या १३ टक्के आरक्षणाचे अ, ब, क, ड असे उपवर्गीकरण करण्याची मागणी प्रलंबित असल्याच्या निषेधार्थ मातंग समाजाच्या वतीने मंगळवारी मुंबईत आंदोलन करण्यात आले. आझाद मैदानावर आंदोलनाचे नियोजन असतानाच आंदोलकांनी सीएसएमटी स्थानक, मुंबई महानगरपालिका मुख्यालय आणि परिसरातील रस्त्यांवर ठिय्या दिल्याने दक्षिण मुंबईतील वाहतूक विस्कळीत झाली. पोलीसांची त्यामुळे एकच धावपळ उडाली.

राज्याच्या विविध भागांतून आलेल्या आंदोलकांनी सीएसएमटी परिसरात मोठी गर्दी केली. अनेक आंदोलक रस्त्यावर बसले, तर काहींनी रस्त्यावरच झोपून ठिय्या दिला. काही आंदोलक बेस्ट बसवरही चढल्याचे दिसून आले. त्यामुळे सीएसएमटी परिसरात वाहतूक कोंडी निर्माण झाली. आंदोलकांना आझाद मैदानात आंदोलन करण्याची परवानगी देण्यात आल्याचे सांगत पोलिसांनी रस्ता मोकळा करण्याचे आवाहन केले. मात्र, आंदोलकांनी माघार घेण्यास नकार दिला. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, आंदोलकांची समजूत काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पान ४ वर

# १ ऑक्टोबरला जिल्ह्यात सर्वत्र स्वच्छता मोहीम

नांदेड/प्रतिनिधी-स्वच्छता ही सेवा पंधरवड्याच्या अनुषंगाने १ ऑक्टोबर रोजी जिल्ह्यात एक दिवस, एक घंटा, एक साथ या संकल्पनेवर आधारित विशेष स्वच्छता व श्रमदान मोहीम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमात नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन स्वच्छतेच्या लोकचळवळीला बळ द्यावे, असे आवाहन जि.प.चे सीईओ महेश पाटील यांनी केले आहे.

या मोहिमेचा मुख्य उद्देश स्वच्छतेच्या कार्यात नागरिकांचा व्यापक सहभाग वाढविणे हा आहे. विविध सामाजिक घटकांना सहभागी करून सार्वजनिक ठिकाणी विशेष स्वच्छता व श्रमदान करण्यात येणार आहे. नागरिकांनी यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन सीईओ महेश पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी परिक्षीत यादव, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकाले, ग्रा.पं.विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी.बी.गिरी, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे मयूरकुमार आंदेलवाड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नवले आणि शिक्षणाधिकारी माधव सलगर यांनी केले आहे.

# नांदेडमधील २० बालकांवर मुंबईत मोफत हृदय शस्त्रक्रिया

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यातील जन्मजात हृदयरोग असलेल्या २० बालकांना मोफत हृदयशस्त्रक्रियेसाठी मुंबई येथील बालाजी रुग्णालय, भायखळा येथे पाठविण्यात आले.

सेवा संकल्प अभियानांतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या माध्यमातून जिल्ह्यातील १४३ बालकांच्या हृदयविकार तपासणीतून शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरलेल्या या बालकांवर शासनाच्या माध्यमातून मोफत उपचार करण्यात येणार असल्याने पालकांनी समाधान व्यक्त केले आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जि.प.चे सीईओ महेश पाटील, तालुका आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली २८ सप्टेंबर २०२६ रोजी हिंगोली नाका, नांदेड येथील सहयोग रुग्णालयात जन्मजात हृदयविकार असलेल्या बालकांसाठी टूडी इको तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात जिल्ह्यातील एकूण १४३ बालकांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी हृदय शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरलेल्या २० बालकांना पुढील उपचारांसाठी मुंबई येथे रवाना करण्यात आले. या बालकांना तपोवन एक्स्प्रेसने मुंबईकडे पाठविण्यात आले. यावेळी आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनुपमा शिंदे , पान ४ वर

# होय रे भाऊ!दुष्काळ एकच,मंत्र्यांचे दौरे मात्र अनेक



### दृष्टीक्षेप
प्रदीप नागापूरकर

नांदेड : होय रे भाऊ! महाराष्ट्रात यंदा पाऊस कमी झाला, पिकांचे नुकसान झाले, शेतकरी संकटात सापडला आणि सरकारला दुष्काळ दिसला. पण दुष्काळ दिसल्यानंतर सरकारने केलेली पहिली उपाययोजना काय? मंत्र्यांच्या पाहणी दौऱ्यांची जंगी स्पर्धा! एक मंत्री आले, पाहणी केली. दुसरे आले, पुन्हा पाहणी केली. तिसरे आले, त्यांनीही पाहणी केली. आता चौथा मंत्री कधी येणार, याचीच शेतकरी वाट पाहत असेल! कारण पिके तर गेलीच आहेत; निदान मंत्री किती येतात याची तरी संख्या वाढते आहे!

होय रे भाऊ, दुष्काळ एकच आहे; पण त्याची पाहणी करण्यासाठी मंत्र्यांची कमतरता नाही! गेल्या आठवड्यापासून दुष्काळी आढावा बैठका सुरू आहेत. नांदेडमध्ये कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या उपस्थितीत बैठक झाली. शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत आणि नुकसानीच्या चिंतेत असताना बैठकीत लोकप्रतिनिधी बदाम-काजू खाताना दिसले. मग काय, जनतेनेही या 'काजू-पंचनाम्याची' चांगलीच दखल घेतली! शेतकऱ्याच्या शेतात सोयाबीनचे दाणे दिसेनात आणि बैठकीच्या टेबलावर काजू-बदामाचे दाणे दिसले! हा विरोधाभास महाराष्ट्राच्या दुष्काळाचे खरे चित्र सांगून गेला.त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी धाराशिवसह काही भागांचा पाहणी दौरा केला. शेतकरी मुख्यमंत्र्यांना मिठी मारून रडू लागले. त्यांच्या डोळ्यांतील अश्रू हे कोणत्याही सरकारी अहवालापेक्षा मोठे होते. पण त्या अश्रूंचा पंचनामा झाला का? त्यावर किती मदत मंजूर झाली? हा खरा प्रश्न आहे.आता गेल्या दोन दिवसांपासून मंत्र्यांची पाहणी मोहीम सुरू आहे. कुणी शेतात जात आहे, कुणी बांधावर उभे राहत आहे, कुणी शेतकऱ्यांशी संवाद साधत आहे. फोटो काढले जात आहेत, व्हिडिओ होत आहेत, निवेदने दिली जात आहेत.

पण भाऊ, शेतकरी फोटो अल्बम मागतोय का? त्याला मदत हवी आहे! सरकारने ट्रिगर वन जाहीर केला; पण नांदेड जिल्ह्यातील मुदखेड आणि मुखेड हे दोन तालुके त्यातून वगळले गेले. पाऊस काही भागात चांगला झाला असेल, पण पिकांचे नुकसान झाले नाही असे थोडेच आहे? शेतकऱ्याच्या शेतात जाऊन प्रत्यक्ष परिस्थिती पाहिली तर कागदावरील आकडे आणि जमिनीवरील वास्तव यामधील अंतर सहज दिसते. मग प्रश्न असा, सरकारला दुष्काळ समजण्यासाठी एवढे मंत्री लागतात तरी किती? एक मंत्री गेला की, अहवाल तयार होतो. दुसरा गेला की, दुसरा अहवाल. तिसरा गेला की, आणखी एक आढावा. उद्या कदाचित मंत्रिमंडळाची विशेष बैठक शेताच्या बांधावरच होईल आणि पुढच्या दिवशी सचिवालयातून 'दुष्काळ पाहणीच्या पाहणीचा आढावा' काढला जाईल! अहो सरकार, शेतकऱ्याच्या पिकाची पाहणी झाली, आता त्याच्या खात्यात पैशांची पाहणी कधी होणार? दुष्काळात जनावरांना चारा हवा, पिण्याचे पाणी हवे, पीक नुकसान भरपाई हवी, कर्जाचा दिलासा हवा. शेतकऱ्याला सरकारी गाड्यांचा ताफा नको; त्याच्या दारात मदतीचा आदेश हवा.

मंत्री आले, शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकल्या, डोळे पुसले आणि पुढच्या जिल्ह्याकडे निघून गेले, तर शेतकऱ्याच्या घरात दुष्काळ तसाच राहणार! म्हणून होय रे भाऊ, आता मंत्र्यांनी एकमेकांशी पाहणी दौऱ्याची स्पर्धा करण्यापेक्षा मदत पोहोचवण्याची स्पर्धा करावी. कारण शेतकऱ्याला मंत्री किती आले, याची मोजदाद नकोय; त्याला सरकारकडून किती मिळाले, याची मोजदाद करायची आहे! नाहीतर उद्या महाराष्ट्रातील शेतकरी सरकारला एकच प्रश्न विचारेल, ''होय रे भाऊ, दुष्काळ आमच्या शेतात पडलाय की तुमच्या दौऱ्यांच्या कार्यक्रम पत्रिकेत?''

# प्रत्यक्ष उपाययोजना कधी?

**महाराष्ट्राच्या आभाळाने यंदा पुन्हा एकदा शेतकऱ्यांची परीक्षा घेतली आहे. राज्याच्या काही भागांत पावसाने पाठ फिरवली, तर काही ठिकाणी अतिवृष्टीने हाहाकार माजवला. या विस्कळीत पर्जन्यमानाचा सर्वाधिक फटका शेतीला बसला असून, अनेक भागांत खरीप पिके करपण्याच्या मार्गावर आहेत. मराठवाड्यासह राज्यातील दुष्काळी परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असताना शासनाने 'ट्रिगर-१' लागू करून प्रशासनाला परिस्थितीचा आढावा घेण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र आता प्रश्न केवळ पाहणीचा नाही; शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत कधी मिळणार, हा खरा सवाल आहे.यंदाच्या पावसाळ्याच्या सुरुवातीपासूनच पर्जन्यमानाबाबत अनिश्चितता जाणवत होती. हवामान विभागासह विविध खासगी हवामान तज्ज्ञांकडून समाधानकारक पावसाचे अंदाज व्यक्त करण्यात आले. प्रत्यक्षात मात्र अनेक ठिकाणी पावसाचा खंड वाढत गेला.पिकांची उगवण झाली, पण त्यानंतर आवश्यक असलेल्या पावसाने दडी मारली. परिणामी शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर उभे राहिलेले पीक वाळू लागले. पेरणी, बियाणे, खते, मशागत आणि मजुरीवर झालेला खर्च आता शेतकऱ्याच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर बनत आहे.दुष्काळाची झळ केवळ शेतापुरती मर्यादित राहत नाही.पिके हातातून गेली की, ग्रामीण अर्थव्यवस्थेची चाके मंदावतात. शेतमजुरांना काम मिळत नाही, बाजारपेठेतील उलाढाल घटते आणि गावागावातील कुटुंबांच्या उत्पन्नावर परिणाम होतो. पुढील काही आठवड्यांत जनावरांच्या चाऱ्याचा तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आजच प्रतिबंधात्मक पावले उचलली नाहीत, तर उद्याची परिस्थिती अधिक बिकट होऊ शकते.शासनाने 'ट्रिगर-१' ची घोषणा केली आहे. प्रशासनाच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा असला तरी सामान्य शेतकऱ्याच्या दृष्टीने त्याचे महत्त्व तेव्हाच आहे, जेव्हा त्यानंतर मदतीचा हात प्रत्यक्ष त्याच्यापर्यंत पोहोचतो. 'ट्रिगर-१' म्हणजे पंचनाम्याची सुरुवात; शेतकऱ्याला मात्र नुकसानभरपाईची निश्चिती आणि वेळेवर रक्कम हवी आहे. कागदोपत्री आदेश, बैठका आणि अहवाल यांच्या पलीकडे जाऊन सरकारने आता जमिनीवर उतरून काम करण्याची गरज आहे. दुष्काळग्रस्त भागात पीक नुकसानीचे पंचनामे तातडीने आणि पारदर्शक पद्धतीने झाले पाहिजेत. खरीप पिकांचे झालेले नुकसान लक्षात घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळाली पाहिजे. पीककर्जाच्या वसुलीला दिलासा, कर्जाचे पुनर्गठन, कृषीपंपांच्या वीजबिलाबाबत सवलत, जनावरांसाठी चारा छावण्या, गावांसाठी टँकरची व्यवस्था आणि रोजगाराच्या संधी यांचा एकत्रित आराखडा तयार करणे आवश्यक आहे. आगामी रब्बी हंगामासाठी बियाणे, खते आणि अन्य निविष्ठांची उपलब्धताही सुनिश्चित करावी लागेल.विशेषतः मराठवाड्याचा विचार केला तर परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. दोन-चार चांगल्या पावसाळ्यांमुळे या प्रदेशाचा दुष्काळाचा प्रश्न कायमचा सुटत नाही. काही वर्षे समाधानकारक पाऊस झाला की, संकट टळल्याचा समज निर्माण होतो आणि पुन्हा पावसाने दगा दिला की त्याच समस्येला सामोरे जावे लागते. त्यामुळे दुष्काळ निवारण ही केवळ आपत्कालीन बाब न ठेवता शाश्वत जल व्यवस्थापनाचा विषय म्हणून हाताळली पाहिजे. जलसंधारण, सिंचन विस्तार, नदीजोड, पाणी साठ्यांचे नियोजन आणि पिकांच्या पद्धतीत आवश्यक बदल यावर दीर्घकालीन धोरण आखले पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळी परिस्थितीची दखल घेतली आहे. आता राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत बाधित शेतकरी आणि ग्रामीण भागासाठी ठोस निर्णय होतील, अशी अपेक्षा आहे. घोषणांची संख्या वाढविण्यापेक्षा त्यांची अंमलबजावणी किती वेगाने होते, हे महत्त्वाचे ठरणार आहे. कारण दुष्काळग्रस्त शेतकऱ्याला सरकारी भाषेतील शब्दांची नव्हे, तर आपल्या खात्यात जमा होणाऱ्या मदतीची गरज आहे. मराठवाड्याला वारंवार दुष्काळाच्या संकटाला सामोरे जावे लागते. त्यामुळे प्रत्येक वेळी मदतीची घोषणा करून संकटावर पडदा टाकण्याऐवजी भविष्यात अशा परिस्थितीचा परिणाम कमी करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करणे गरजेचे आहे. पावसाच्या लहरीपणावर सरकारचे नियंत्रण नसले तरी पाण्याचे नियोजन, शेतीचे व्यवस्थापन आणि संकटग्रस्तांना दिलासा देणे निश्चितच शासनाच्या हातात आहे.दुष्काळ जाहीर करणे हा अंतिम निर्णय नाही; तो शासनाच्या कृतीचा प्रारंभ बिंदू आहे. आता प्रशासनाने कागदावरील आकडे बाजूला ठेवून गावागावातील वास्तव तपासावे. शेतकऱ्याच्या शेतात जाऊन परिस्थिती पाहावी आणि त्यानुसार तातडीचे निर्णय घ्यावेत.घोषणा झाल्या, पाहणी सुरू झाली; आता मदत कधी येणार? हा प्रश्न आज महाराष्ट्रातील प्रत्येक संकटग्रस्त शेतकरी आणि ग्रामीण नागरिक विचारत आहे. या प्रश्नाचे उत्तर विलंबाने नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून मिळाले पाहिजे. कारण करपलेल्या पिकांना आश्वासनांनी पालवी फुटत नाही आणि तहानलेल्या गावांची तहान घोषणांनी भागत नाही. 'ट्रिगर-१' नंतर आता प्रत्यक्ष मदतीचा ट्रिगर दाबण्याची वेळ आली आहे!**

# कोट्यवधींचा खर्च सणावर करण्यापेक्षा मानवकल्याणासाठी करा



गणपती विसर्जनाचा उत्सव यंदाही महाराष्ट्रभर मोठ्या उत्साहात, भक्तिभावाने आणि जल्लोषात साजरा झाला. ढोल-ताशांचा गजर, आकर्षक रोषणाई, मिरवणुका, सजावट आणि गणरायाला दिलेला निरोप यामुळे सर्वत्र उत्साहाचे वातावरण होते. मानाचे गणपती असोत किंवा सार्वजनिक मंडळांचे गणपती, भाविकांनी मोठ्या श्रद्धेने दर्शन घेतले. गणरायाला निरोप देताना अनेकांच्या डोळ्यांत अश्रू होते. भक्ती, श्रद्धा आणि परंपरा यांचा सुंदर संगम या उत्सवात पाहायला मिळाला. मात्र, या उत्साहाबरोबरच काही गंभीर प्रश्नही समाजासमोर उभे राहिले आहेत. भक्तीच्या नावाखाली होणारा अमाप खर्च, शक्तिप्रदर्शन, ध्वनिप्रदूषण, मद्यपान करून होणारा धिंगाणा, गर्दीतील गैरप्रकार आणि व्हीआयपी संस्कृती याकडे आता गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

गणपती हा विद्येचा, बुद्धीचा आणि विवेकाचा देव मानला जातो. त्यामुळे गणेशोत्सवातून समाजाला विवेक, शिस्त, संयम आणि मानवतेचा संदेश मिळणे अपेक्षित आहे. मात्र काही ठिकाणी भक्तीपेक्षा तिचे प्रदर्शन अधिक होताना दिसते. रात्री उशिरापर्यंत मोठ्या आवाजात डीजे, स्पीकर आणि वाद्ये वाजवणे, त्यावर तरुणाईचे बेभान होऊन नाचणे, काही जण मद्यधुंद अवस्थेत रस्त्यावर फिरणे, किरकोळ कारणांवरून वाद आणि भांडणे होणे, या गोष्टी भक्तीचा भाग कशा काय असू शकतात, हा प्रश्न पडतो.गणेशोत्सव हा केवळ मनोरंजनाचा किंवा शक्तिप्रदर्शनाचा उत्सव नाही. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला व्यापक सामाजिक आणि राष्ट्रीय स्वरूप देताना समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला होता. तत्कालीन परिस्थितीत ब्रिटिश सत्तेविरुद्ध सामाजिक एकजूट निर्माण करण्यासाठी हा उत्सव महत्त्वाचा ठरला. आज २१व्या शतकात परिस्थिती बदलली आहे. त्यामुळे त्या परंपरेचा आधुनिक काळाशी मेळ घालत गणेशोत्सवातून सामाजिक प्रबोधन, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संवर्धन, गरिबांना मदत आणि समाजोपयोगी उपक्रमांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. आज महाराष्ट्रातील अनेक भागांत आर्थिक संकटाचे सावट आहे. अनेक शेतकऱ्यांच्या शेतात पिके उभी राहिली नाहीत. काही ठिकाणी पिके वाळून गेली आहेत. काही भागांत पाण्याची टंचाई आहे. टँकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ अनेक गावांवर आली आहे. शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी आणि निम्न उत्पन्न गटातील नागरिकांना दैनंदिन जीवनाचा खर्च भागवणेही कठीण होत आहे. अशा परिस्थितीत एखाद्या गणपती मंडळाने लाखो रुपये सजावट, रोषणाई किंवा अनावश्यक खर्चावर करण्यापेक्षा त्यातील काही भाग गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी, रुग्णांच्या उपचारासाठी, गरीब कुटुंबांना अन्नधान्य देण्यासाठी किंवा जलसंधारणासाठी वापरला तर त्या कार्याला निश्चितच अधिक सामाजिक अर्थ प्राप्त होईल.गणपतीच्या नावाने खर्च करणे चुकीचे नाही; पण खर्चाचा उद्देश काय आहे, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. देवाला मोठी सजावट, महागडी आरास किंवा लाखो रुपयांची रोषणाई आवश्यक आहे का? देव भक्ती पाहतो की खर्च? भक्तीला पैशांची गरज असते का? या प्रश्नांचा प्रत्येकाने स्वतःशी संवाद साधणे गरजेचे आहे.

दर्शनाच्या व्यवस्थेबाबतही यंदा अनेक ठिकाणी प्रश्न उपस्थित झाले. मोठ्या मंडळांच्या दर्शनासाठी सामान्य भाविकांना दीर्घकाळ रांगेत उभे राहावे लागले. वृद्ध, महिला, लहान मुले आणि आजारी व्यक्तींना तासन्तास प्रतीक्षा करावी लागली. दुसरीकडे काही मान्यवर, मंत्री, अधिकारी किंवा राजकीय नेत्यांना तुलनेने सुलभ मार्गाने दर्शन मिळत असल्याचे दृश्य अनेक ठिकाणी पाहायला मिळाले. सुरक्षेच्या दृष्टीने विशेष व्यवस्था करणे आवश्यक असले तरी सामान्य भाविक आणि व्हीआयपी यांच्यातील दरी वाढणार नाही, याची काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे.एखादा गरीब भाविक अनेक तास रांगेत उभा राहतो, गर्दीत तडफडतो आणि शेवटी दर्शन न घेताच परत जातो, तर त्या भक्ताच्या मनात प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. देव सर्वांचा असेल तर त्याच्या दर्शनातही समानतेची भावना असायला नको का? ज्याच्याकडे पैसा, सत्ता किंवा पद आहे त्याला देव जवळ आणि सामान्य माणसाला देव दूर, अशी भावना निर्माण होणे ही चिंतेची बाब आहे.



दत्तोपंत डहाळे
नांदेड.

काही ठिकाणी एखाद्या गणपतीला नवसाला पावणारा किंवा सत्य गणपती अशा स्वरूपात संबोधले जाते. श्रद्धेचा विषय म्हणून लोक विविध नावांनी देवाला संबोधतात, हे मान्य. मात्र सत्य गणपती म्हटल्यावर इतर गणपती असत्य ठरतात का, असा प्रश्न निर्माण होतो. गणपती हा सर्वांचा देव आहे. त्याला स्पर्धेच्या चौकटीत बसविण्याची किंवा एका गणपतीला दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ ठरविण्याची गरज नाही. देवत्वाला बाजारपेठेचे स्वरूप देणे टाळले पाहिजे.भक्तीच्या नावाखाली देणग्या गोळा करताना काही ठिकाणी सामान्य नागरिकांवर अप्रत्यक्ष दबाव येतो. वर्गणी द्या, मंडळाला मदत करा या आग्रहातून अनेक जण केवळ सामाजिक संबंध किंवा भविष्यातील वाद टाळण्यासाठी पैसे देतात. नको म्हणालो तर संबंध बिघडतील या भीतीने देणगी देण्याची वेळ येत असेल तर त्या देणगीला स्वेच्छेचे स्वरूप राहते का, याचाही विचार करायला हवा. धार्मिक उत्सव हा आनंदाचा असावा; आर्थिक किंवा सामाजिक दबावाचा नाही. गणेशोत्सवातील मिरवणुका आणि ध्वनिप्रदूषण हाही गंभीर विषय आहे. ढोल-ताशे, बँड, डीजे आणि मोठ्या आवाजातील स्पीकर यांचा मर्यादित वापर समजू शकतो. मात्र रात्री उशिरापर्यंत प्रचंड आवाज करणे, रुग्णालये, वृद्ध नागरिक, विद्यार्थी, लहान मुले यांचा विचार न करणे योग्य नाही. उत्सवाचा आनंद घेताना दुसऱ्याला त्रास होणार नाही, ही मूलभूत सामाजिक जाणीव असणे आवश्यक आहे.गर्दीच्या ठिकाणी चोरी, पाकीटमारी, महिलांची छेडछाड, भांडणे किंवा मद्यधुंद अवस्थेत होणारे गैरप्रकार घडण्याची शक्यता वाढते. त्यामुळे पोलिस प्रशासनावर मोठी जबाबदारी असते. यंदा अनेक ठिकाणी मोठ्या गर्दीचे व्यवस्थापन करताना पोलिस यंत्रणेने काम केले. मात्र पोलिसांवरचा ताण कमी करण्यासाठी मंडळांनीही स्वयंशिस्त पाळणे गरजेचे आहे. केवळ पोलिसांनी नियंत्रण ठेवावे आणि नागरिकांनी नियम मोडावेत, अशी भूमिका चालणार नाही.

गणेशोत्सवातून सामाजिक कार्याची नवी दिशा देता येऊ शकते. एखाद्या मंडळाने मोठा देखावा उभारण्याऐवजी रक्तदान शिबिर आयोजित केले, गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य दिले, गरजू रुग्णांना मदत केली, वृक्षारोपण केले, पाण्याची बचत करण्याबाबत जनजागृती केली, शेतकऱ्यांच्या कुटुंबांना मदत केली किंवा एखाद्या गावात जलसंधारणाचे काम केले, तर त्या कार्यातून गणरायाची खरी सेवा होईल.गणपती ही विद्येची देवता आहे. त्यामुळे मंडळांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे. एखाद्या गरजू विद्यार्थ्याची फी भरली, पुस्तकांचा संच दिला, स्पर्धा परीक्षेची पुस्तके उपलब्ध करून दिली किंवा डिजिटल शिक्षणाची सुविधा निर्माण केली, तर तो गणेशोत्सव वर्षभर स्मरणात राहील. हजारो रुपयांची काही तासांची रोषणाई संपून जाते; पण एखाद्या मुलाच्या शिक्षणासाठी केलेली मदत त्याचे संपूर्ण आयुष्य बदलू शकते.

मोठा गणपती असावा की छोटा, यापेक्षा गणपतीसमोरचा आपला आचार मोठा असावा. महागडी सजावट करण्यापेक्षा साधी, पर्यावरणपूरक आणि अर्थपूर्ण सजावट असावी. गणपतीसमोर जुगार, दारू, अनावश्यक मनोरंजन किंवा समाजाला चुकीचा संदेश देणाऱ्या कृती होऊ नयेत. कीर्तन, भजन, प्रवचन, सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक प्रबोधन आणि प्रसादाचे महत्त्व यांना प्राधान्य मिळावे.आज आर्थिक परिस्थितीचे भान ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. एका बाजूला सणासाठी लाखो रुपये खर्च होत असताना दुसऱ्या बाजूला अनेक कुटुंबांना घर चालविण्यासाठी संघर्ष करावा लागत असेल, तर समाजाने आत्मपरीक्षण केले पाहिजे. उत्सव बंद करा, असा याचा अर्थ नाही. उलट उत्सव अधिक अर्थपूर्ण करा, असा त्यामागचा विचार आहे.भक्तीवर कोणाचाही आक्षेप नाही. श्रद्धा ही प्रत्येकाच्या वैयक्तिक जीवनाचा भाग आहे. मात्र भक्तीचे प्रदर्शन, स्पर्धा आणि अतिरेक टाळणे आवश्यक आहे. आपल्या घरातील गणपती असो किंवा सार्वजनिक मंडळातील गणपती, त्यामागे श्रद्धा, संस्कृती आणि सामाजिक बांधिलकी असावी. उत्सवामुळे समाज जोडला जावा; तुटू नये. आनंद निर्माण व्हावा; त्रास नव्हे. मदत वाढावी; दिखावा नव्हे.

महाराष्ट्रात पुढेही अनेक सण येतील. त्या प्रत्येक सणाकडे आर्थिक परिस्थिती, पर्यावरण, सामाजिक गरजा आणि सार्वजनिक शिस्त यांचा विचार करून पाहण्याची वेळ आली आहे. शेतकरी अडचणीत असेल, कामगार अडचणीत असेल, विद्यार्थी शिक्षणासाठी संघर्ष करत असेल आणि गरीब कुटुंब उपचारासाठी पैसे शोधत असेल, तर त्याच्या मदतीला धावून जाणे हीच खरी मानवसेवा आहे.गणरायाकडे आपण बुद्धी, विवेक आणि सद्बुद्धीची प्रार्थना करतो. मग त्या प्रार्थनेचा अर्थ आपल्या आचरणातूनही दिसला पाहिजे. भक्तीला मोठ्या खर्चाची आवश्यकता नाही. देवापुढे मनापासून नतमस्तक होण्यासाठी पैशांची गरज नसते. संयम, सेवा, सहकार्य, सद्भावना आणि मानवता यांच्यापेक्षा मोठी आरास कोणतीही नाही.म्हणूनच गणेशोत्सव साजरा करूया; पण विवेकाने. भक्ती करूया; पण अतिरेक नको. मिरवणुका काढूया; पण ध्वनिप्रदूषण नको. मंडळे उभारूया; पण समाजोपयोगी कार्यालाही स्थान देऊया. वर्गणी जमा करूया; पण सक्ती नको. मोठ्या सजावटीपेक्षा मोठे सामाजिक कार्य करूया. गरिबाला मदत करूया, विद्यार्थ्याला शिक्षण देऊया, रुग्णाला उपचाराची मदत करूया, शेतकऱ्याच्या कुटुंबाच्या दुःखात सहभागी होऊया.

गणपती हा बुद्धी आणि विद्येचा अधिष्ठाता आहे. त्यामुळे आपल्या समाजाला विवेकाची दिशा मिळणे हीच खरी गणरायाची आराधना आहे. कोट्यवधी रुपयांचा खर्च केवळ काही दिवसांच्या दिखाव्यावर करण्यापेक्षा त्यातील काही हिस्सा मानवकल्याणासाठी खर्च झाला, तर गणेशोत्सवाची खरी सामाजिक उंची वाढेल. देवाला सोन्याची आरास नको; भक्ताच्या मनातील निर्मळ भावना आणि गरजू माणसाच्या चेहऱ्यावरचे समाधान अधिक महत्त्वाचे आहे.गणपती बाप्पा मोरयाचा जयघोष करताना माणूसकी जपूया हा संदेशही तितक्याच ताकदीने समाजात पोहोचला पाहिजे. हाच गणेशोत्सवाचा खरा सामाजिक अर्थ आहे.

# उस्मानशाही मिल पुनर्जीवित करण्यासाठी प्रयत्न करणार-खा.रवींद्र चव्हाण



## नियोजन भवन येथे सर्वपक्षीय बैठक संपन्न

नांदेड/प्रतिनिधी- जिल्ह्याच्या रोजगाराचा प्रश्न सोडविण्यासाठी पोषक ठरणारी नांदेड टेक्सटाईल मिल (उस्मान शाही मिल) पुनर्जीवित करण्यासाठी राज्य व केंद्र सरकारला पाठपुरावा करून मिल पुनर्जीवित करून नांदेडचे गतवैभव सर्वांच्या सहकार्याने प्राप्त करून देण्याचा विश्वास खा. रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी व्यक्त केला आहे. उस्मान शाही मिल संवर्धन समितीच्या वतीने दि.२७ सप्टेंबर रोजी नियोजन भवन येथील सर्वपक्षीय बैठकीत खा. रवींद्र चव्हाण बोलत होते. २१ ऑगस्ट २०२६ रोजी माननीय जिल्हाधिकारी नांदेड यांना अभ्यास मंडळ गठित करण्याची सूचना दिल्याची माहिती रवींद्र चव्हाण यांनी दिली व १४ ऑक्टोबर २०२६ रोजी परत एकदा जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक लावून आढावा घेणे येईल असे सांगितले.

पुढे बोलताना खासदार रवींद्र चव्हाण म्हणाले केंद्र सरकारच्या वस्त्रोद्योग समितीचा सदस्य असल्याने बैठकांमध्ये वारंवार नांदेड येथील उस्मानशाही मिलच्या विषयावर चर्चा करण्याची संधी मिळाली आहे. केंद्राच्या या समितीच्या माध्यमातून सरकारकडून सुरू असलेल्या उद्योग निर्मिती व वृद्धीसाठीच्या योजनांचा लाभ घेऊन एनटीसी मिल सुरू करण्यासाठी सातत्याने सर्वांच्या सहकार्याने पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. खा. रवींद्र चव्हाण हे स्वतः केंद्राच्या वस्त्र उद्योग कमिटीमध्ये सदस्य आहेत. केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री यांच्यासोबत दिल्ली येथे हिवाळी अधिवेशनात निवेदन देऊन व एन टी सी उस्मान शाही मिल संवर्धन समितीचे सदस्य या शिष्टमंडळात राहतील असे त्यांनी सांगितले. संयोजन समितीचे प्रवीण जेठेवाड यांनी बोलताना अभ्यासपूर्ण मांडणी करीत मिलसाठी उपलब्ध मालमत्ता, सामग्री, तांत्रिक क्षमता, आर्थिक व्यवहार्यता, आवश्यक निधी, मनुष्यबळ, तांत्रिक व प्रशासकीय बाबीची तसेच गुजरात व तमिळनाडू राज्यातील कंपन्या द्वारे अहवाल तयार करण्याची विनंती त्यांनी केली व इतर राज्यातील वस्त्रोद्योग निर्मिती व रोजगार वृद्धीची माहिती दिली.

उस्मानशाही मिल संवर्धन समितीचे संयोजक तरनुम मोहम्मद यांनी मनोगत व्यक्त करताना नांदेडमध्ये वस्त्रोद्योग सुरू करण्यासाठी च्या दीडशे एकर जागेचा वापर करावा व एक हजार कोटी निधी केंद्र शासनाकडून मंजूर करून आणावे व यासाठी शासकीय यंत्रणा व खाजगी यंत्रणामार्फत संयुक्त विद्यमाने हा कारखाना सुरू करावा अशी विनंती केली. या बैठकीचे प्रास्ताविक श्याम निलंगेकर यांनी केले. प्रास्ताविकामध्ये श्याम निलंगेकर म्हणाले की नांदेडमध्ये तरुणांच्या हाताला काम नसल्यामुळे नांदेडचे तरुण गुन्हेगारीकडे वळलेले आहेत त्यांना औद्योगिक क्षेत्रात काम दिल्यास तरुण बेरोजगार राहणार नाही त्यामुळे एनटीसी मिल पुन्हा एकदा चालू करावी व तरुणांना रोजगार उपलब्ध करून द्यावा अशी मागणी त्यांनी केली, बळवंत मोरे, शकीला मॅडम, स.रवींद्र मोदी, ॲड.शिवराज कोळीकर, ॲड.सचिन मगर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या वेळी सि.पी.आयचे सचिव प्रदीप नागपूरकर, कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला आघाडी जिल्हा अध्यक्षा इंजि.प्रांजली रावणगावकर, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाआध्यक्ष प्रा.राज अटकोरे, रोहन कहाकेकर कावेरी ढगे, सुभाष लोखंडे, जनता दलाचे डॉ.किरण चिद्रावर, समाजवादी पार्टीचे अयुबखान पठाण, शिव सेनाचे सचिन पाटील, मोईज खान, राष्ट्रवादी कॉंग्रेस अल्पसंख्याक सेलचे जिल्हाध्यक्ष ॲड.जमीर पठाण, कॉंग्रेसच्या नेत्या डॉ.रेखा चव्हाण, ॲड.सुरेंद्र घोडजकर,भीम प्रहारचे जिल्हा अध्यक्ष दीपक पवळे, स.मनप्रीत सिंघ पुजारी, स.बलमित्रसिंघ चावला, कॉ.भगवान नाईक, राजेंद्रकुमार तुडमे, जमिलोद्दीन सिद्धीकी, अमीन शुक्ला, भीम आर्मीचे जिल्हाध्यक्ष किरण सदावर्ते, स्वप्नील भोसीकर, खोब्राजी निखाते, प्रकाश चितळकर, काजी जमलोद्दीन, कॉ. मीना आरसे, कॉ.जयराज गायकवाड, गोविंद सिंग भोसीवाले, मंगेश वट्टेवाड, विनायक कामठेकर यांच्यासह अनेक पक्षाचे मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीचे प्रास्ताविक व संचालन व आभार प्रदर्शन श्याम निलंगेकर यांनी केले.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# नादुरुस्त वीज ट्रान्सफॉर्मर तातडीने बदला-आ.राजेश पवार

नायगाव/प्रतिनिधी-नायगाव विधानसभा मतदार संघातील शेतकरी व नागरिकांना महावितरणकडून होणाऱ्या अवेळी वीज खंडित होण्यासह नादुरुस्त ट्रान्सफॉर्मरच्या समस्येला सामोरे



जावे लागत असल्याच्या तक्रारी आ.राजेश पवार यांच्याकडे प्राप्त झाल्या होत्या. याची दखल घेत त्यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना वीजपुरवठ्याच्या समस्या तातडीने सोडविण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या.

परिस्थितीत लवकर सुधारणा झाली नाही तर संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाईची मागणी करण्यासोबतच शेतकऱ्यांसह महावितरण कार्यालयावर धडक मोर्चा व आमरण उपोषण करण्याचा इशारा आ.पवार यांनी दिला.यानंतर महावितरणकडून नायगाव विधानसभा मतदारसंघातील शेती व घरगुती वीजपुरवठ्याचे नादुरुस्त ट्रान्सफॉर्मर बदलण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे.दरम्यान, पिण्याचे पाणी, शेती अथवा अन्य कोणतेही ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त असल्यास तसेच विद्युत पोल पडले असल्यास नागरिकांनी संपूर्ण माहितीसह फोटो आ.राजेश पवार यांच्या ९८२३०६०००० या व्हॉट्सप क्रमांकावर पाठवावेत, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात काँग्रेसचे जोरदार निषेध आंदोलन

नांदेड/प्रतिनिधी-भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी निवडणूक प्रक्रियेत केलेल्या भ्रष्ट कारभार व वोट चोरी विरोधात दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा खासदार रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात आणि उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे व महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांच्या पुढाकाराने शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालया पुढे सोमवार (ता.२८) रोजी जोरदार निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी ज्ञानेश कुमार यांच्या राजिनाम्याची मागणी करण्यात आली.

निवडणूक आयोगाने निपक्षपाती काम करणे अपेक्षित असताना ज्ञानेश कुमार यांच्या निवडणूक आयोगाने भाजपा हिताचे काम केले आहे. याबाबत वेळोवेळी लोकसभा विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधी यांनी पर्दाफाश केला आहे. हल्लीच एका राष्ट्रीय प्रसारमाध्यमाने निवडणूक आयोगातील मतभेद जगजाहीर करत वोटचोरीवर शिक्कामोर्तब केला आहे, यामुळे ज्ञानेश कुमार यांनी तातडीने राजिनामा द्यावा असे प्रतिपादन खा. रवींद्र चव्हाण यांनी यावेळी केले. यावेळी माजी आ. माधवराव पाटील जवळगावकर, उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार, डॉ. यशपाल भिंगे, डॉ. श्रावण रँपनवाड, डॉ. रेखाताई चव्हाण, सुरेंद्र घोडजकर, राजेश पावडे, अब्दुल सत्तार, आनंद चव्हाण, संजय बेळगे, संजय कऱ्हाळे, प्रा. आनंत राऊत, कुमार कुर्तडीकर, महेश देशमुख तरोडेकर, प्रा.मनुरकर, आनंदराव गुंडिले, नगराध्यक्ष रफिक भाई, नगरसेवक मुन्ना अब्बास, सत्यपाल सावंत, पाशा भाई, शोहब हुसेन, मोसिम खान, शहबाज फहिज, राजू गोडबोले, मो. इब्राहिम, सचिन टाले, सुरेश हटकर, गोविंद बाबा गोंड, विनोद कांनचगिरे, तातेराव शिंदे, अजिज कुरेशी, मुन्तजिब, अतुल पेदेवाड, गणेश ढगे, शंकर शिंदे, सुरज शिंदे, अक्षय नळगे, ज्योती कदम, जेशिका शिंदे, नसिम पठाण, सुरेखा वैद्य, विमल किर्तने, शेर अली, गगन यादव, प्रविण कानगुले, दिपकसिंग हुजारिया, बापूसाहेब पाटील, अब्दुल रहिम, रमेश चित्ते, आनंद कल्याणकर, संदीप देशमुख, संजय वाघमारे, शिवहरी गाडे, निरंजन पावडे, नागराज सुलगेकर, राजू बोळसेकर, अभिलाष पावडे,



व्यंकट मोरे, प्रताप देशमुख, जसपालसिंघ तबेलेवाले, आंबादास रातोळे, संदीप काळबांडे, महेश चव्हाण, विजय सोंडारे,पंजाब चव्हाण, अलिम खान, सय्यद रिहान, उत्कर्ष सोंडारे, गोविंद पाटील,किशन कदम, प्रसेनजित वाघमारे, अब्दुल वहाब, भिवाजी कदम, अनिल कदम, अमोल कदम, श्रीकांत जोगदंड, प्रल्हाद गव्हाणे, देविदास कदम, एसपी कुंभारे, लतीफ शेख, नुरोद्दीन शेख, प्रभू उरुदवाड, शेख असलम, आदित्य सोंडारे,प्रकाश दिपके, अजहर शेख आदीसह इतर पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लकी ड्रॉतील गाळे मिळूनही ताबा नाही;रेणुका देवी संस्थानकडे न्यायाची गाळे धारकांची मागणी

माहूर/प्रतिनिधी-श्री रेणुकादेवी संस्थानच्या पायथ्याशी उभारण्यात आलेल्या तात्पुरत्या व्यापारी संकुलातील लकी ड्रॉद्वारे मंजूर झालेले गाळे प्रत्यक्ष ताब्यात न मिळाल्याने अनिल बंडू राठोड आणि शेख नय्युम शेख इसाक यांनी सोमवार, २८ सप्टेंबरपासून माहूर तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे.



श्री रेणुकादेवी संस्थानकडून लिफ्ट व स्कायवॉकचे काम सुरू करण्यात आले आहे. या कामासाठी एका बाजूचे व्यापारी विस्थापित झाल्यानंतर त्यांच्या पुनर्वसनासाठी टीनशेडचे ३५ तात्पुरते गाळे तयार करून लिलाव करण्यात आला. या प्रक्रियेत अनिल बंडू राठोड यांना गाळा क्रमांक ११, तर शेख नय्युम शेख इसाक यांना गाळा क्रमांक २३ मंजूर झाला होता.मात्र, गाळ्यांचा ताबा देताना आपल्याला डावलून इतर व्यक्तींना संबंधित गाळे देण्यात आल्याचा आरोप दोघांनी केला आहे. याप्रकरणी त्यांनी तहसीलदार तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दाद मागितली होती. १० ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण केल्यानंतर तहसीलदारांना योग्य ती कार्यवाही करून गाळे देण्याचे निर्देश देण्यात आल्याचे त्यांचे म्हणणे आहे. मात्र, चार महिने उलटूनही आदेशाची अंमलबजावणी झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तहसीलदार तसेच श्री रेणुकादेवी संस्थान व्यवस्थापन समितीने तातडीने लक्ष घालून मंजूर गाळ्यांचा ताबा मिळवून द्यावा, अशी मागणी उपोषणकर्त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# शेतकऱ्यांच्या हाकेला प्रतिसाद; लोकप्रतिनिधींच्या पाठपुराव्याला यश

## जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानंतर हजारो शेतकऱ्यांना दिलासा



देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यात यंदा पावसाच्या तुटीमुळे तूर, कापूस व ज्वारी ही उभी पिके संकटात सापडली आहेत. अशा वेळी येडुर साठवण तलावात उपलब्ध असलेल्या पाण्यातून शेतीसाठी दोन पाणीपाळ्या सोडण्याची मागणी केवळ शेतकऱ्यांची नव्हे, तर काळाची गरज होती. या प्रश्नाची गंभीर दखल घेत राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी नांदेडच्या जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक निर्देश दिल्याने हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

या निर्णयामागे राज्यसभा खा.डॉ. अजित गोपछडे यांनी सातत्याने केलेला पाठपुरावा आणि स्थानिक पातळीवर आ. जितेश अंतापूरकर यांनी मांडलेली मागणी महत्त्वाची ठरली. दुष्काळसदृश परिस्थितीत लोकप्रतिनिधींनी केवळ निवेदने न देता प्रत्यक्ष पाठपुरावा करून प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला, ही बाब निश्चितच स्वागतार्ह आहे. आता प्रशासनानेही मंत्र्यांच्या निर्देशांची तातडीने अंमलबजावणी करून दोन पाणीपाळ्या वेळेत उपलब्ध करून द्याव्यात. कारण उशिरा मिळालेली मदत अनेकदा उपयोगाची राहत नाही. उभी पिके वाचली तरच शेतकरी सावरणार आणि जनावरांच्या चाऱ्याचाही प्रश्न काही प्रमाणात सुटणार आहे. या निर्णयाबद्दल राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे, खा.डॉ. अजित गोपछडे आणि आ. जितेश अंतापूरकर यांचे आभार व्यक्त करत भाजप नेते तथा अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नारायण पाटील रमतापुरकर तसेच पंचायत समितीचे माजी उपसभापती रामदास पाटील बेंबरेकर यांनी समाधान व्यक्त केले असून, शेतकऱ्यांच्या हितासाठी अशाच सकारात्मक निर्णयांची अपेक्षा व्यक्त केली आहे. या निर्णयाचे स्वागत करून बेबंरा, रमतापूर ,येडूर (खु,) येडुर (बु) सोमवार कोकलगाव, मानुर आदी गावासह या भागातील शेतकऱ्यांनी खा.डॉ. अजित गोपछडे व आ.जितेश अंतापुरकर यांचे आभार मानले आहेत.

# अनाथ व निराधार बालकांसाठी शासकीय योजनांची माहिती;एमपीजेतर्फे मार्गदर्शन शिबिर यशस्वी

नांदेड/प्रतिनिधी-समीक्षक मूव्हमेंट फॉर पीस अँड जस्टिस (एमपीजे), नांदेड यांच्या वतीने २७ सप्टेंबर रोजी शासकीय योजनांची माहिती व त्यांचा लाभ घेण्याच्या प्रक्रियेबाबत मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला गरजू स्त्री-पुरुषांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिबिरात बाल संगोपन योजनेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. अनाथ मुले, आई किंवा वडिलांपैकी एकाचा आधार नसलेली मुले, आई-वडिलांपैकी कोणी गंभीर आजाराने ग्रस्त असलेली मुले तसेच पालक तुरुंगात असल्यामुळे आधारापासून वंचित असलेल्या बालकांना या योजनेचा लाभ मिळू शकतो, अशी माहिती देण्यात आली. पात्र लाभार्थ्यांना दरमहा २ हजार ५०० रुपयांची आर्थिक मदत मिळते. या योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया आणि अर्ज कुठे सादर करायचा, याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.बाल संगोपन योजनेचे कायदेशीर सल्लागार अधिवक्ता इरफान शेख यांनी उपस्थितांना कायदेशीर व योजनात्मक माहिती दिली. तसेच अल्ताफ हुसेन, अझहर खान आणि एजाज अहमद यांनीही विविध शासकीय योजनांच्या लाभाबाबत मार्गदर्शन केले. शिबिराची प्रस्तावना आणि सखोल मार्गदर्शन समीम सर यांनी केले. यावेळी अल्ताफ हुसेन यांनी लाभार्थ्यांना आवश्यक कागदपत्रे तयार करून आणण्याचे आवाहन केले. २५ ऑक्टोबर रोजी पुन्हा उपस्थित राहावे. संस्थेकडे उपलब्ध असलेले अर्ज भरून देण्यात येतील तसेच अर्ज कुठे सादर



करायचा, याबाबत मार्गदर्शन करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. याशिवाय संजय गांधी निराधार योजना आणि एकल महिला योजनेची माहितीही शिबिरात देण्यात आली. समाजातील अधिकाधिक गरजू महिला व पुरुषांनी संबंधित शासकीय योजनांची माहिती घेऊन त्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी एमपीजेच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. शेवटी एमपीजेचे शहराध्यक्ष खालिक सर यांच्या आभार प्रदर्शनाने शिबिराची सांगता झाली.

जा.क्र.नांवाशमनपा/क्षे.का.६/१२८३/२०२६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक : ३१-०८-२०२६

## जाहीर प्रगटन

**संचिका क्रं.२२७/४०/क्षे.का.क्र.६ (सिडको)/२०२६-२७**
**प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सौ. **सिडको/संतोष केदारसिंग पडूळे** मौजे हाडको रा.**हाडको** नांदेड यांचा अर्ज दि.३१/८/२०२६ यांनी अर्ज सादर केला आहे की मनपा/सिडको घर क्रं.-- **टाईप -- सेक्टर --** शेत सर्वे नं.-- गट क्र.-- प्लॉट/प्लॅट (सदनिका) क्र.-- एकूण क्षेत्रफळ **३५** चौ./मी. चौ.फूट आहे.

ज्याचा महानगरपालिका मालमत्ता क्रं.**११-१०-२८०** पिन क्रं.**४०५११०१२०८ मौजे हाडको सिडको/चंद्रकांत/केदारलिंग धर्मय्या पडूळे रा.--** यांचे नांवे नोंद असलेली मालमत्ता अर्जदाराने खरेदीखत/विक्रीखत/सोसायटी कन्व्हेन्स डीड/ओनरशिप पध्दतीने विक्रीखत/भाडेपट्टा हस्तांतरन (सिडको/हडको दस्त क्रं.**४९५९/२०२६ दि.१८.०५.२०२६ व सिडको प्रशासन भाडेपट्टा हस्तांतरण आदेश (T.T.O.)** क्रं.सिडको ट्रान्सफर ऑर्डर दस्त क्र. **CIDCO/ADM/NND/2026/216** दि.०१/०५/२६ सातबारा पत्रक दि.-- व लिंक दस्त क्र.-- /-- दि.-- अधारे -- प्राप्त झालेली आहे त्यांचे नांवाचे नोंद नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर आकारणी नोंदवहीत घेण्यात येत आहे.

तरी या संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसाचे आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासह दाखल करावा. अन्यथा वरील आवधी संपल्यानंतर सदरील मालमत्तेवर अर्जदाराचे नावाने मालमत्ता कर आकारणी नोंदवहीत सदरील नावाची नोंद घेण्यात येईल.

**चर्तुःसिमाः- पुर्व**- ड्रेनेज लाईन, **पश्चिमेस**-रिकामी जागा, **दक्षिणेस**-ND-42/J2/21/02, **उत्तरेस**-रिकामी जागा

स्वाक्षरित/-
**क्षेत्रीय अधिकारी,**
क्षेत्रिय कार्यालय क्रं.६ (सिडको),
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

## जाहीर प्रगटन

अर्धापुर येथील दिवाणी न्यायाधिश, क.स्तर, अर्धापूर यांच्या न्यायालयात
समक्ष के.एच.लोहगावकर दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,अर्धापुर
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२०१/२०२६
गिरीजाबाई व इतर वि.निरंक

अर्जदार : १. गिरीजाबाई भ्र.भावूराव कदम, वय : ८१ वर्षे, धंदा : घरकाम रा.कोंढा ता.अर्धापूर जि.नांदेड, २. शांताबाई भ्र.भगवानराव जगताप उर्फे शांताबाई पि.भावूराव कदम, वय : ५१ वर्षे, धंदा : घरकाम रा.गनपूर ता.अर्धापूर जि.नांदेड, ३. मजलसाबाई भ्र.सुभाशराव शिंदे उर्फे मजलसाबाई पि.भावूराव कदम, वय : ५८ वर्षे, धंदा : घरकाम रा.तरोडा खु.मालेगाव रोड नांदेड ता.जि.नांदेड, ४. संजय भावूराव कदम, वय : ५३ वर्षे, धंदा : मजूर रा.कोंढ ता.अर्धापूर जि. नांदेड, ५. मिनाक्षी भ्र.धोंडीबा पवार उर्फे मिनाक्षी पि.भावूराव कदम, वय : ५० वर्षे, धंदा : घरकाम रा.शहापूर ता.अर्धापूर जि.नांदेड
वि.

गैरअर्जदार : निरंक
दावा : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७, कलम २ व ३ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत भावूराव जयराम कदम यांची अर्जदार क्र.१ ही पत्नी, अर्जदार क्र.२, ३ व ५ ह्या विवाहीत मुली आहेत. तर अर्जदार क्र.४ हा मुलगा आहे. भावूराव जयराम कदम यांचा मृत्यु दिनांक १९.०७.२०२६ रोजी रा.कोंढा ता.अर्धापूर जि.नांदेड येथे झाला.

अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः न्यायालयात दिनांक २७/१०/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक २३/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,क.स्तर,
अर्धापुर

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**स.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,अर्धापुर

# दुष्काळी यादीतून मुखेड वगळल्याने शेतकऱ्यांत संताप!

## शासनाने तातडीने फेरसर्वेक्षण करुन तालुक्याचा समावेश करावा-डॉ.यशपाल भिंगे

नांदेड/प्रतिनिधी- महाराष्ट्र शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाने खरीप हंगाम २०२६ मध्ये ट्रिगर-१ लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून विविध उपाययोजना व सवलती लागू करण्याचा शासन निर्णय २५ सप्टेंबर रोजी जारी केला आहे. या निर्णयाच्या परिशिष्ट-१ मध्ये नांदेड जिल्ह्यातील १४ तालुक्यांचा समावेश करण्यात आला असून, मुखेड तालुक्याला मात्र दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीतून वगळण्यात आले आहे. शासनाचा हा निर्णय अन्यायकारक असून त्याचा तातडीने फेरविचार करावा, अशी मागणी डॉ. यशपाल भिंगे यांनी केली आहे.



नांदेड, बिलोली, कंधार, लोहा, हदगाव, भोकर, देगलूर, किनवट, हिमायतनगर, माहूर, धर्माबाद, उमरी, अर्धापूर आणि नायगाव या तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करण्यात आला आहे. मात्र, मुखेड तालुक्याची परिस्थितीही प्रतिकूल असताना त्याला यादीत स्थान न मिळाल्याने तालुक्यातील शेतकरी आणि ग्रामीण नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. खरीप हंगामात प्रतिकूल हवामान, पर्जन्यमानातील असमानता, पिकांची झालेली हानी, पाण्याची कमतरता आणि शेतीच्या वाढत्या खर्चामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. अशा परिस्थितीत मुखेड तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश न झाल्याने शेतकऱ्यांना शासनाच्या विविध सवलती आणि मदतीपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. दुष्काळग्रस्त तालुक्यांसाठी शासनाकडून जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जवसुलीस स्थगिती, कृषी पंपांच्या वीजबिलात सवलत, विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, रोजगार हमीच्या कामांना गती, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता तसेच पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देण्यासारख्या उपाययोजना केल्या जातात. त्यामुळे मुखेड तालुक्याला या सवलतींपासून वंचित ठेवणे शेतकऱ्यांच्या दृष्टीने गंभीर बाब असल्याचे डॉ. भिंगे यांनी म्हटले आहे. मुखेड तालुक्यातील प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेऊन पर्जन्यमान, पिकांची स्थिती, पाण्याची उपलब्धता आणि शेतकऱ्यांचे झालेले नुकसान यांचे तातडीने फेरसर्वेक्षण करावे. त्यानंतर मुखेड तालुक्याचा दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत समावेश करून सुधारित शासन निर्णय जारी करावा, अशी मागणी डॉ. यशपाल भिंगे यांनी शासनाकडे केली आहे.

## फॉगींग मशिनद्वारे फवारणीची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील समतानगर भागातील नाल्या सर्वत्र कचऱ्याने तुंबलेल्या असून यावर मच्छरांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. बदलत्या वातावरणाच्या तडाख्यात अबाल वृद्धांसह तरुण महिला, पुरुष आधीच आजारी पडल्याचे पहावयास मिळत आहे. त्यात उघड्या नाल्यांमधील कचरा न काढल्यामुळे या भागात मच्छरांचा प्रादुर्भाव कमालीचा वाढला आहे. या मच्छरांमुळे येथील नागरिकांचे आरोग्य बिघडत आहे. मनपा प्रशासनाने तात्काळ या भागातील नाल्यावर फॉगींग मशिनद्वारे फवारणी करुन मच्छरांपासून सुटकारा मिळवून देण्याची मागणी होत आहे.

## आठ आठवड्यांचा आदेश;लाभ मात्र अद्याप नाही!

# एकस्तर वेतनश्रेणी व अतिरिक्त घरभाडे भत्त्यासाठी शिक्षक संघ आक्रमक

किनवट/प्रतिनिधी- दुर्गम आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या भवितव्याला आकार देण्यासाठी प्रतिकूल परिस्थितीत ज्ञानदान करणाऱ्या शिक्षकांच्या हक्काच्या मागण्यांवर प्रशासनाची दिरंगाई सुरू असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या तालुका शाखेने केला आहे. पात्र शिक्षकांना एकस्तर पदोन्नती वेतनश्रेणी आणि अतिरिक्त घरभाडे भत्ता तातडीने लागू करावा, या मागणीसाठी शिक्षक संघ आता आक्रमक झाला असून, मागण्यांची पूर्तता न झाल्यास न्यायालयीन मार्गाचा अवलंब करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

यासंदर्भात शिक्षक संघाच्या शिष्टमंडळाने पंचायत समिती, किनवट येथील गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठातील याचिका क्र.७५२४/२०२६ संदर्भित करत पात्र शिक्षकांना न्यायालयीन आदेशानुसार लाभ देण्याची मागणी संघाने केली आहे. न्यायालयाच्या निर्देशानुसार आठ आठवड्यांच्या कालावधीत संबंधित लाभ देणे अपेक्षित असतानाही त्याची अंमलबजावणी झालेली नसल्याचे संघाचे म्हणणे आहे.

**आदेश कागदावर नको, प्रत्यक्ष वेतनात लाभ द्या!**

शासकीय परिपत्रके, संबंधित विभागांचे अधिकारपत्र आणि न्यायालयीन आदेशांचा संदर्भ असतानाही स्थानिक पातळीवर कार्यवाहीला विलंब का होत आहे, असा सवाल शिक्षक संघाने उपस्थित केला आहे. दुर्गम आणि आदिवासी भागात सेवा बजावणाऱ्या शिक्षकांना नियमानुसार मिळणारे लाभ देण्यात प्रशासनाकडून टाळाटाळ होत असल्यास त्याची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. प्रशासनाने पात्र शिक्षकांच्या मागण्यांवर तातडीने निर्णय घेतला नाही, तर मा. उच्च न्यायालयात अवमानना याचिका दाखल करण्याचा इशारा शिक्षक संघाने दिला आहे. त्यामुळे आता निवेदनावर प्रशासन कोणती कार्यवाही करते, याकडे शिक्षकांचे लक्ष लागले आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही निवेदनाच्या प्रती शिक्षक संघाच्या निवेदनाच्या प्रती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडेही पाठविण्यात आल्या आहेत. त्यामुळे हा प्रश्न आता केवळ तालुका-स्तरावर मर्यादित न राहता जिल्हास्तरीय प्रशासनाच्या पातळीवर पोहोचला आहे. निवेदनावर तालुकाध्यक्ष राजकुमार बाविस्कर, सरचिटणीस जगदीश कोमरवार, कार्याध्यक्ष दत्तात्रय मुंढे, किशन धुर्वे, मारोती मडावी, राजेन्द्र नागरगोजे, मधुकर पोतकँठवार, प्रविण बनवसकर आणि धनंजय नाईकवाडे यांच्यासह शिक्षक प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या



आहेत. न्यायालयीन आदेश, शासकीय निर्देश आणि शिक्षक संघाची आक्रमक भूमिका यामुळे आता प्रशासनाच्या पुढील निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पात्र शिक्षकांना प्रत्यक्ष लाभ कधी मिळणार, हा प्रश्न मात्र अद्याप अनुत्तरित आहे.



माजी खा.डॉ.व्यंकटेश काब्दे यांच्या कार्याचा गौरव दै.सामनाने वर्धापन दिनानिमित्त काढलेल्या अंकात करण्यात आला आहे. तो अंक देतांना दै.सामनाचे विभागीय प्रतिनिधी विजय जोशी, लेखक अॅड.कॉ.प्रदीप नागापूरकर व डॉ.काब्दे दिसत आहेत.

## आदिलाबाद-मांडवी-माहूर-पोहरादेवी-वाशीम लोहमार्गाला अंतिम मंजुरी मिळावी

### 'रेल्वे संघर्ष समिती'ची खा.प्रतिभाताई धानोरकर यांच्याकडे मागणी

मांडवी/प्रतिनिधी-विदर्भ आणि मराठवाड्याच्या सीमावर्ती भागातील लाखो नागरिकांसाठी आणि भाविकांसाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरणाऱ्या आदिलाबाद-मांडवी-माहूर-पोहरादेवी-वाशीम या तब्बल २६० किलोमीटर लांबीच्या प्रस्तावित रेल्वे मार्गाला केंद्र सरकार व रेल्वे मंत्रालयाकडून अंतिम मंजुरी मिळवून देण्यासाठी रेल्वे संघर्ष समितीने चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा क्षेत्राच्या खा.प्रतिभाताई धानोरकर यांना निवेदनाद्वारे साकडे घातले आहे.

दि.२४ सप्टेंबर रोजी दिलेल्या निवेदनात समितीने म्हटले आहे की, या प्रस्तावित रेल्वे मार्गासाठी चित्रपट निर्माते दिग्दर्शक संजुकुमार राठोड यांनी कांग्रेस सरकारच्या काळात मागणी लावून धरली होती. मार्गाचे २०१३ मध्येच सॅटेलाइट सर्वेक्षण यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहे. रेल्वे बोर्डाने २,६२५ कोटी ८५ लाख रुपयांचा प्राथमिक खर्चाचा विस्तृत प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवला असून, २०२३-२४ मध्ये महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पाच्या ५० टक्के आर्थिक वाटा उचलण्याची ऐतिहासिक घोषणा केली होती. २६० किमी लांबीचा मार्ग: या मार्गावर १२ महत्त्वाची रेल्वे स्थानके प्रस्तावित आहेत. धार्मिक पर्यटनाला चालना: श्री क्षेत्र माहूरगड आणि बंजारा समाजाची काशी मानले जाणारे श्री क्षेत्र पोहरादेवी ही दोन महान श्रद्धास्थाने थेट देशाच्या नकाशावर जोडली जातील. आर्थिक विकास: या रेल्वे मार्गामुळे स्थानिक व्यापार, शेतीमाल वाहतूक आणि रोजगाराच्या संधींना अभूतपूर्व चालना मिळणार आहे. प्रकल्पाची सर्व पूर्वतयारी झाली असून, राज्य शासनाचा वाटाही निश्चित झाला आहे. आता केवळ केंद्र सरकार आणि रेल्वे मंत्रालयाच्या अंतिम मंजुरीची आवश्यकता आहे. खा. प्रतिभाताई धानोरकर यांनी आपल्या खंबीर नेतृत्वाच्या बळावर केंद्र स्तरावर आक्रमक पाठपुरावा करून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला लवकरात लवकर हिरवा कंदील मिळवून द्यावा, अशी मागणी रेल्वे संघर्ष समितीचे अध्यक्ष सुरेश धर्मा राठोड आणि सचिव सुनील बापुराव श्रीमनवार यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## ज्येष्ठ पत्रकार संजीव कुलकर्णी यांना कै.यशवंत पाध्ये स्मृती पुरस्कार २०२६ जाहीर

नांदेड/प्रतिनिधी-ज्येष्ठ पत्रकार तथा दैनिक पुढारीचे नांदेड जिल्हा आवृत्ती प्रमुख मा. संजीव कुलकर्णी यांची पत्रकारितेच्या क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल महाराष्ट्र संपादक परिषदेच्या वतीने दिला जाणारा कै. यशवंत पाध्ये स्मृती पुरस्कार २०२६ प्रदान करण्यासाठी निवड करण्यात आली आहे.

या पुरस्काराचे निमंत्रण मान्यवरांच्या उपस्थितीत संजीव कुलकर्णी यांना देण्यात आले. लवकरच मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण



सोहळा आयोजित करण्यात येणार आहे. यावेळी महाराष्ट्र संपादक परिषद, मुंबईचे कार्यकारिणी सदस्य तथा ज्येष्ठ पत्रकार धोंडोपंत विष्णुपुरीकर, तसेच महाराष्ट्र संपादक परिषदेचे आजीव सदस्य दैनिक वाचकमंचचे संपादक राजेश पटने, साप्ताहिक जनप्रतिकचे संपादक गजानन वाघपावन, साप्ताहिक बहुआयामी विचारचे संपादक भास्कर डोईबळे तसेच दैनिक नांदेड एकजुटचे जिल्हाप्रतिनिधी भारत गठेवार उपस्थित होते. पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल उपस्थित मान्यवरांनी संजीव कुलकर्णी यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.



महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस ओबीसी सेलच्या उपाध्यक्षपदी बालासाहेब देशमुख आंबेगावकर यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करतांना माजी जि.प.सदस्य दिगंबर पवार, दादाराव पाटील पुयड, श्यामराव मनाठकर, भगवान पाटील, चेअरमन दिगंबर पवार, धनंजय उमरीकर यांच्यासह इतर मान्यंवर उपस्थित होते.

# मानवकेंद्री संशोधनातूनच समाजाचा विकास-अॅड.कॉ.प्रदीप नागापूरकर



नांदेड/प्रतिनिधी- स्पर्धात्मक युगातील संशोधन व नवकल्पनांमधून निर्माण होणारी बौद्धिक संपदा मानवाच्या जीवनासाठी उपयुक्त ठरण्यासोबतच तिला कायदेशीर संरक्षण मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन नांदेड एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव अॅड. कॉ. प्रदीप नागापूरकर यांनी केले.

नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सायन्स कॉलेजमध्ये राष्ट्रीय बौद्धिक संपदा जागरूकता अभियानांतर्गत 'बौद्धिक संपदा अधिकार (आयपीआर) आणि नवशिक्यांसाठी पेटंट/डिझाइन फाइलिंग' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. एनईएस क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी सभागृहात झालेल्या कार्यशाळेला विद्यार्थी, संशोधक व प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अध्यक्षस्थानी अॅड. कॉ. प्रदीप नागापूरकर होते. प्रमुख पाहुणे डॉ. शैलेश जे. वाढेर, तर रिसोर्स पर्सन म्हणून भारत सरकारच्या पेटंट कार्यालयातील असिस्टंट कंट्रोलर ऑफ पेटंट्स अँड डिझाइन्स डॉ. भारत एन. सूर्यवंशी उपस्थित होते. माजी प्राचार्य डॉ. डी. यू. गवई यांचीही उपस्थिती होती. यावेळी डॉ. सूर्यवंशी यांनी पेटंट, डिझाइन, ट्रेडमार्क व कॉपीराइट तसेच पेटंट व डिझाइन नोंदणीची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे आणि अर्ज पद्धती याबाबत मार्गदर्शन केले. सहभागींच्या प्रश्नांना उत्तरे देत त्यांनी फायलिंगची प्रत्यक्ष प्रक्रिया समजावून सांगितली. कार्यशाळेचे संयोजन प्राचार्य डॉ. एल. पी. शिंदे यांनी केले. उपप्राचार्य डॉ. ए. आर. शुक्ला व श्री. ई. एम. खिल्लारे सहसंयोजक होते. आयक्यूएसी समन्वयक डॉ. पी. एस. बोरकर व डॉ. व्ही. एन. नरवाडे यांनी आयोजनासाठी सहकार्य केले.

पान १ वरुन

### मुदखेड,मुखेड तालुक्यातील...

शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.दरम्यान, पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाणीवापराबाबत स्पष्ट शासन निर्णय काढण्याचे निर्देश देण्यात आले. पिण्याच्या पाण्यात जनावरांच्या पाण्याचाही समावेश करून त्यानंतर इतर वापराचे प्राधान्यक्रम ठरवण्याची सूचना करण्यात आली.दहावी-बारावी परीक्षा शुल्काबाबतही महत्त्वाचा निर्णय घेत, शुल्क घेऊन नंतर परत करण्याऐवजी दुष्काळी भागातील विद्यार्थ्यांकडून आधीच शुल्क घेऊ नये, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. तसेच डीपीडीसीच्या माध्यमातून अधिकाधिक दुष्काळ निवारणाची कामे हाती घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

### अग्निवीरांना सरकारी नौकरीत...

अपारंपरिक चारा स्रोतांचा या धोरणात विचार करण्यात येणार आहे.गृह विभागाच्या न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाचा २७६१ पदांचा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आला. तसेच महाराष्ट्र कारागृहे सुधारसेवा अधिनियम, २०२५मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचसाठी ४५९ पदे निर्माण करण्यास मंजुरी देण्यात आली. वाळूज येथे दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय स्थापन करण्यासही मान्यता देण्यात आली.दरम्यान, महाराष्ट्र लॉजिस्टिक्स धोरण-२०२४ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. लॉजिस्टिक्स पार्कना विशेष भांडवली प्रोत्साहन देण्याबरोबरच झोन- व झोन-२ मधील पार्कना १०० टक्के, तर झोन-३ मधील पार्कना ७५ टक्के मुद्रांक शुल्क सवलत देण्यात येणार आहे.

### मातंग समाजाच्या...

अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाबाबत शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी आंदोलकांची प्रमुख मागणी आहे. उपवर्गीकरणाचा शासन निर्णय जाहीर होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याची भूमिका आंदोलकांनी घेतली आहे.

## संभाजीराव हानवते काकांडीकर यांचे निधन

नांदेड/प्रतिनिधी- श्रावस्तीनगर येथील रहिवासी संभाजीराव हानवते काकांडीकर (वय ९२) यांचे सोमवार, दि. २८ रोजी दुपारी निधन झाले. त्यांच्या निधनाने काकांडीकर कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे. ते ऑडिटर मधुकर हानवते व पत्रकार अशोक काकांडीकर यांचे वडील होत.



संभाजीराव हानवते काकांडीकर यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, तीन सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच नातेवाईक, मित्रपरिवार व परिचितांनी हळहळ व्यक्त केली. त्यांच्या पार्थिवावर आज गोवर्धन घाट येथील शांतीधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार, प्रतिष्ठीत नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरुन

### ज्ञानेशकुमार विरोधात...

दरम्यान, निवडणूक आयोगाने मात्र एसआयआरशी संबंधित आदेश आणि वेळापत्रकांना आयोगाची एकमताने मंजुरी असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे याचिकेत करण्यात आलेले आरोप आणि आयोगाची अधिकृत भूमिका यामध्ये मतभेद असल्याचेही समोर आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची पुढील आठवड्यात सुनावणी घेण्यास सहमती दर्शवली असून, आता या सुनावणीत बहुसदस्यीय निवडणूक आयोगाच्या निर्णयप्रक्रियेबाबत घटनात्मक आणि कायदेशीर तरतुदींचा कसा अर्थ लावला जातो, याकडे लक्ष लागले आहे.

### नांदेडमधील २० बालकांवर...

सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी आणि निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाभाऊ बुट्टे उपस्थित होते. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील ४५ आरोग्य पथकांमार्फत अंगणवाडीतील बालकांची वर्षातून दोन वेळा, तर शालेय विद्यार्थ्यांची वर्षातून एकदा आरोग्य तपासणी केली जाते.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४